RNI No. MAHBIL /2012/46121

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ९, अंक १] मंगळवार, जानेवारी ३, २०२३/पौष १३, शके १९४४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक १**

**प्राधिकृत प्रकाशन**

**नवी मुंबई महानगरपालिका (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२१ मधील सुधारणेस मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक नमुंम-१२१९/प्र.क्र.१३७ (भाग-१) (अ)/नवि-२८**

मंत्रालय (मुख्य इमारत), ४ था मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ डिसेंबर,२०२२.

**संदर्भ:**–(१) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.नमुंम-१२१९/प्र.क्र.१३७/नवि-२८, दि.३०.०३.२०२१.

(२) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.नमुंमपा/सा.प्र./आस्था-१/प्र.क्र./४६२१८४६/२०२१, दिनांक ४ जुलै २०२२.

(३) या विभागाचा शासन निर्णय क्र. नमुंम-१२१९/प्र.क्र.१३७ (भाग-१) (ब)/नवि-२८, दिनांक १५ डिसेंबर २०२२

**प्रस्तावना-**

नवी मुंबई महानगरपालिका सेवा(सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२१ ला, संदर्भ क्र.१ च्या दि.३०.०३.२०२१ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता प्राप्त झाली आहे. सदर सेवा प्रवेश नियमांमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व पदांचे सेवाप्रवेश नियम मंजूर करण्यात आले.

२. नवी मुंबई महानगरपालिकेच्या, सन २०२१ मध्ये मंजूर सेवा प्रवेश नियमांमध्ये महानगरपालिकेच्या विविध विभागातील ६ पदांच्या [जीवशास्त्र वेत्ता, हेल्थ सुपरवायझर, आरोग्य सहाय्यक (महिला), आरोग्य सहाय्यक(मलेरिया), स्वच्छता निरीक्षक, लेखा लिपिक] नेमणूक पद्धतीमध्ये सुधारणा करण्याबाबत, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी संदर्भ क्र. २ च्या दिनांक ४ जुलै २०२२ च्या पत्रान्वये, प्रस्ताव शासनास सादर केला होता. त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश नियमाबाबतच्या दिनांक ३० मार्च

२०२१ च्या शासन निर्णयामधील,६ पदांसाठीच्या नेमणूकीच्या पद्धतीमध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय :-**

नवी मुंबई महानगरपालिकेतील विविध संवर्गासाठी दिनांक ३० मार्च २०२१ च्या शासन निर्णयाद्वारे, मंजूर करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियमासोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५४, ४५५, ४५६, ४५७(३) व ४६५ (१) (ल) अन्वये प्राप्त अधिकारात, महानगरपालिकेच्या विविध विभागातील, ०६ पदांच्या [जीवशास्त्रवेत्ता, हेल्थ सुपरवायझर, आरोग्य सहाय्यक (महिला), आरोग्य सहाय्यक (मलेरिया), (बदललेले पदनाम 'आरोग्य सहाय्यक') स्वच्छता निरीक्षक, लेखा लिपिक] नेमणूकीच्या पद्धतीमधील सुधारणेस "परिशिष्ट-२, अनुसूची-अ" अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. या नियमास "नवी मुंबई महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२१" चा सुधारित भाग असे संबोधण्यात येईल.

३. सदर सुधारित नियम, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी तात्काळ शासन राजपत्रात प्रसिद्ध करावेत. हे नियम शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

४. या अनुषांगिक सर्व सांविधानिक बाबींची पूर्तता आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी करावयाची आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२२१२१५१५४०४८९५२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

**शा.नि.क्र. नमुंम-१२१९/प्र.क्र.१३७/नवि-२८, दि.३०.०३.२०२१ सोबतचे परिशिष्ट-२, अनुसूची 'अ'**

| अ. क्र. (१) | पदनाम व श्रेणी (२) | सध्याची नेमणुकीची पद्धत व टक्केवारी (३) | सुधारित मंजूर करण्यात आलेली नेमणुकीची पद्धत व टक्केवारी (४) |
|---|---|---|---|
| १ | जीवशास्त्र वेत्ता (श्रेणी-२, निमवैद्यकीय सेवा) | **पदोन्नती-१००%**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत हेल्थ सुपरवायझर पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | **नामनिर्देशन/सरळसेवा**<br>(अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची प्राणीशास्त्र/ सूक्ष्म जीवशास्त्र शाखेची पदवी.<br>(ब) संबंधित कामाचा २ वर्षाचा अनुभव.<br>(क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>**पदोन्नती**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत हेल्थ सुपरवायझर यापदावर किमान ३ वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या व मान्यताप्राप्त विद्यापीठाची प्राणीशास्त्र/सूक्ष्म जीवशास्त्र शाखेची पदवी धारण करणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| २ | हेल्थ सुपरवायझर (श्रेणी-३, निमवैद्यकीय सेवा) | **पदोन्नती-१००%**<br>अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची प्राणीशास्त्र/सूक्ष्म जीवशास्त्र शाखेची पदवी. | **पदोन्नती १००%**<br>नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत आरोग्य सहाय्यक (महिला)/ आरोग्य सहाय्यक या संवर्गातील किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्याची एकत्रित सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

| अ. क्र. (१) | पदनाम व श्रेणी (२) | सध्याची नेमणुकीची पद्धत व टक्केवारी (३) | सुधारित मंजूर करण्यात आलेली नेमणुकीची पद्धत व टक्केवारी (४) |
|---|---|---|---|
| | | (ब) शासनाच्या बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांसाठी विहित केलेला किमान १२ महिन्यांचा प्रशिक्षण पाठ्यक्रम (M.P.W.) उत्तीर्ण.<br>(क) नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत आरोग्य सहाय्यक (महिला)/आरोग्य सहाय्यक (मलेरिया)/ अळी निरीक्षक/ मलेरिया निरीक्षक/ बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (हिवताप)/ किटक संहारक (बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी) या संवर्गातील किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्याची एकत्रित सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | |
| ३ | आरोग्य सहाय्यक (महिला) (श्रेणी-३, निमवैद्यकीय सेवा) | **सरळसेवा-५०%**<br>(अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण.<br>(ब) संबंधित विषयातील कामाचा २ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>(क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>(ड) निवडीनंतर १२ महिन्यांचा प्रशिक्षण पाठ्यक्रम (M.P.W.) २ वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.<br>**पदोन्नती-५०%**<br>नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत प्रसविका (ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ) (ए.एन.एम.) या संवर्गातील एल.एच. व्ही. पदाचे प्रशिक्षण पूर्ण झालेल्या व किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | **नामनिर्देशन/सरळसेवा-५०%**<br>(अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची विज्ञान शाखेची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण.<br>(ब) संबंधित विषयातील कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>(क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>(ड) निवडीनंतर १२ महिन्यांचा प्रशिक्षण पाठ्यक्रम (M.P.W.) किमान २ वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.<br>**पदोन्नती-५०%**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत प्रसविका (ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ) (ए.एन.एम.) या संवर्गातील किमान ३ वर्ष सेवा व एल.एच.व्ही. पदाचे प्रशिक्षण पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

| अ. क्र.<br>(१) | पदनाम व श्रेणी<br>(२) | सध्याची नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>(३) | सुधारित मंजूर करण्यात आलेली नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>(४) |
|---|---|---|---|
| ४ | आरोग्य सहाय्यक<br>(श्रेणी-३, निमवैद्यकीय सेवा) | **नामनिर्देशन/सरळसेवा-२५%**<br>(अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची विज्ञान शाखेची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण.<br>(ब)मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>(क) निवडीनंतर १२ महिन्यांचा प्रशिक्षण पाठ्यक्रम (M.P.W.) २ वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.<br>**पदोन्नती-७५ %**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत मलेरिया निरीक्षक/अळी निरीक्षक/ बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (हिवताप)/ किटक संहारक (बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी) या संवर्गातील किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या व नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्याची एकत्रित सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | **नामनिर्देशन/सरळसेवा-२५%**<br>(अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची विज्ञान शाखेची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण.<br>(ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>(क) निवडीनंतर १२ महिन्यांचा प्रशिक्षण पाठ्यक्रम (M.P.W.) २ वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.<br>**पदोन्नती-७५%**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत मलेरिया निरीक्षक/अळी निरीक्षक/ बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (हिवताप)/ किटक संहारक (बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी) या संवर्गातील किमान ३ वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची एकत्रित सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ५ | स्वच्छता निरीक्षक<br>(श्रेणी-३, सार्वजनिक आरोग्य सेवा) | **नामनिर्देशन/सरळसेवा-५०%**<br>(अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.<br>(ब) स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण.<br>(क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>(ड) उप निरीक्षकाची पदे व्यपगत दर्शविली असल्याने ती पूर्णतः व्यपगत झाल्यानंतर स्वच्छता निरीक्षकाची पदोन्नतीने भरावयाची पदे सरळसेवेने भरण्यात यावीत. | **नामनिर्देशन/ सरळसेवा-२५%**<br>(अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.<br>(ब) स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण.<br>(क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>(ड) उपनिरीक्षकाची पदे व्यपगत दर्शविली असल्याने ती पूर्णतः व्यपगत झाल्यानंतर स्वच्छता निरीक्षकाची पदोन्नतीने भरावयाची पदे सरळसेवेने भरण्यात यावीत. |

| अ. क्र. (१) | पदनाम व श्रेणी (२) | सध्याची नेमणुकीची पद्धत व टक्केवारी (३) | सुधारित मंजूर करण्यात आलेली नेमणुकीची पद्धत व टक्केवारी (४) |
|---|---|---|---|
| | | **पदोन्नती-५०%** नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवरील उप स्वच्छता निरीक्षक या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | **पदोन्नती-७५%** नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवरील उप स्वच्छता निरीक्षक या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ६ | लेखा लिपिक (श्रेणी-३, लेखा सेवा) | **नामनिर्देशन/सरळसेवा-१००%** (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी. (ब) मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे व इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. (क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | **नामनिर्देशन/सरळसेवा-९०%** (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी. (ब) मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे व इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. (क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. **पदोन्नती-१०%** नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील चतुर्थ श्रेणीतील पदावर किमान ३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रतिभा पाटील,**
शासनाच्या अवर सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.